| CNR No.MHWR040004912024 | नोंदणी तारिख | ०७/०३/२०२४ |
|---|---|---|
| | दाखल तारिख | ०७/०३/२०२४ |
| | निकाल तारिख | १८/०७/२०२६ |
| | कालावधी | ०२ वर्षे, ०४ म, ११ दि. |

# न्यायनिर्णय

(घोषीत दिनांकः १८/०७/२०२६)

आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई), ७७(अ) अन्वये अपराधाच्या आरोपासाठी सदरचा खटला करण्यात आला आहे.

२. अभियोगपक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता यांचा तसेच आरोपीतर्फे विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकण्यात आला. प्रकरणाच्या न्यायनिर्णयाकरिता माझ्या समक्ष खालील मुद्दे उपस्थित झाले असून त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे आहे.

| | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने सिद्ध केले काय की, दिनांक १५/०९/२०२३ रोजी वेळ १०.२० ते १०.५० वाजताचे सुमारास मौजा दहेगांव(गोसावी), ता.सेलू व जिल्हा–वर्धा, येथे आरोपीच्या घरझडतीतून एका थैलीत ९० मि.लि.च्या देशी दारुने भरलेल्या १५० शिश्या अवैधरित्या विनापरवाना जवळ बाळगतांना मिळुन आला तसेच दारुबंदी अधिका–याने परवान्याची मागणी केली असता परवाना आरोपीने सादर केला नाही, म्हणून आरोपीने महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५(ई), ७७(अ) अन्वये गून्हा केला आहे ? | : | नकारार्थी |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | कोणता आदेश ? | : | **आरोपी निर्दोषमुक्त.** |

## :: कारणमीमांसा ::

३. अभियोग पक्षाने आरोपीवरील गुन्हा सिध्द करण्यासाठी पंच साक्षीदार मंगेश विजयराव तिजारे यांची साक्ष निशाणी क्र.०५ पुढे नोंदविली. पुरेशी संधी देवुनही इतर साक्षीदारांना उपस्थित ठेवण्यात अभियोगपक्षाला यश आले नाही. त्यामुळे निशाणी क्र.१ वर आदेश पारीत करून अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. खटला चालवित असतांना आरोपीविरूध्द गुन्ह्या संदर्भात कोणतीही विधाने आलेली नसल्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३१३(१)(ब) प्रमाणे आरोपीची जबानी नोंदविण्यात आली नाही.

**मुद्दा क्र.१ बाबत** :

४. अभियोगपक्षाने आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५(ई), ७७(अ) प्रमाणे आरोप सिध्द करण्यासाठी आरोपी हा स्वतःच्या फायदयासाठी अथवा विक्रीसाठी दारु अवैधरित्या विनापरवाना जवळ बाळगतांना मिळून आला तसेच दारुबंदी अधिका-याने परवान्याची मागणी केली असता परवाना आरोपीने सादर केला नाही, ही बाब सिध्द करणे आवश्यक आहे.

५. त्या अनुषंगाने अभियोगपक्षाने मौकाजप्ती पंच साक्षीदार क्रमांक १ मंगेश विजयराव तिजारे यांची साक्ष निशाणी क्र.०५ पुढे नोंदविली. सदर साक्षीदार मौकाजप्तीपंच साक्षीदार असून त्यांच्या साक्षीप्रमाणे दिनांक १५/०९/२०२३ रोजी पोलिसांनी त्यांना पंच म्हणून कुठेही बोलविले नव्हते. पोलीसांनी त्यांच्या समक्ष कोणतीही कार्यवाही केली नाही. पोलीसांनी त्यांच्या समक्ष काहीही जप्त केले नाही. पोलीसांनी त्यांची एका लिहिलेल्या कागदावर सही घेतली. त्यांना सदरचा मौकाजप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यांनी पंचनाम्यावरील त्यांच्या सह्या ओळखल्या त्यावरील मजकूराबाबत त्यांना काहीही माहित नसल्याचे कथन केले.

म्हणून विद्वान सरकारी वकिलांनी त्यांना परवानगीनंतर उत्तर सूचक प्रश्न विचारले असता त्यांनी नाकारले की, दिनांक १५/०९/२०२३ रोजी पोलिसांनी त्यांना मौजा दहेगांव(गोसावी), तालुका–सेलू व जिल्हा–वर्धा येथे पंच म्हणून बोलविले होते. पोलीसांनी त्यांच्या समक्ष आरोपीच्या घराची घरझडती घेतली असता आरोपीच्या ताब्यातुन एका थैलीत ९० एम.एल.च्या १५० शिश्या जप्त केली व त्याबाबत मौकाजप्ती पंचनामा तयार केला. पोलीसांनी मौका जप्ती पंचनामा घटनास्थळावर तयार केला व त्यावर मी वाचुन व समजून सही केली. जप्त मालापैकी एक ९० मि.लि.ची शिशी सी.ए.परिक्षणाकरिता नमुना काढुन घेतली व त्यावर त्यांची, दुसरा पंच, आरोपी व पोलीसांच्या सहीने लाखेने डबल सील केले.

६. प्रस्तूत प्रकरणात अभियोगपक्षाने फिर्यादी व तपासी अंमलदार यांना तपासले नाही. अभियोगपक्षाने मौकाजप्ती पंचनामा सिध्द करण्याकरीता मौकाजप्ती पंच साक्षीदार तपासले, परंतु तपासण्यात आलेल्या मौकाजप्ती पंचानी परस्पर विरोधी जबाब दिला व सरकारी वकिलांनी घेतलेल्या उलटतपासामध्ये ही आरोपीला गुंतविण्यासाठी काहीही सांगितले नाही. त्यामुळे मौकाजप्ती पंचनामा सिध्द झालेला नाही. अशा परिस्थितीत घटनास्थळावरुन पोलीसांनी आरोपीच्या घरझडतीतून एका थैलीत ९० मि.लि.च्या देशी दारुने भरलेल्या १५० शिश्या अवैधरित्या विनापरवाना जप्त केली, ही बाब सिध्द झाली नाही.

७. अभियोगपक्षातर्फे रासायनिक तज्ञाचा अहवाल अभिलेखावर सादर करण्यात आला आहे परंतु त्या अनुषंगाने कुठलाही पुरावा उपलब्ध केला नाही. तसेच रासायनिक परीक्षणाकरीता नेलेला नमुना कोणत्या मोहररने नेला त्या मोहररची साक्ष तपासण्यात आली नाही. विषेशतः सदर खटल्यात जप्त करण्यात आलेला वर नमुद मुद्देमाल हा आरोपीच्या ताब्यातून जप्त करण्यात आला याबाबत कुठलाही ठोस किंवा मौखिक पुरावा अभिलेखावर आलेला नाही. आरोपीच्या

ताब्यातून वर नमुद मुद्देमाल जप्तीची बाब व आरोपीविरुध्द कुठलाही ठोस किंवा कागदोपत्री पुरावा अभिलेखावर आणण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरले आहे.

८. त्यामुळे अभिलेखावरील एकदंरीत पुराव्याचे अवलोकन करता अभियोग पक्षाने आरोपीने महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई), ७७(अ) अन्वये गुन्हा केल्याचे सिध्द केले नाही. त्यामुळे आरोपीला संशयाचा फायदा देऊन मी मुद्दा क्रमांक १ चे उत्तर नकारार्थी नोंदविते.

**<u>मुद्दा क्र.२ बाबत :</u>**

९. अपराध क्र.१३४/२०२३ मध्ये जप्त मुद्देमाल आधीच विल्हेवाटीकरिता राज्य उत्पादन शुल्क, वर्धा यांच्या कडे पाठविण्यात आलेला आहे. वरील मुद्दांचा नकारार्थी निष्कर्ष पाहता आरोपी हा त्याच्यावर ठेवलेल्या आरोपामधून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. वरील सर्व कारणाचा विचार करता, मी मुद्दा क्रमांक २ च्या निष्कर्षात,खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपी नामे **तेजराम झाडुजी राणा** याची महाराष्ट्र दारूबंदी कायद्याचे कलम ६५(ई), ७७(अ) च्या गुन्ह्यातून भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम २७८(१) [फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २५५(१)] अन्वये निर्दोषमुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीचे वैयक्तीक बंधपत्रक रद्द करण्यात येते.

३. अपराध क्र.१३४/२०२३ मध्ये भरलेली सुरक्षा राशी रक्कम जर असेल तर आरोपीला अपिल कालावधी संपल्यानंतर परत करण्यात यावी.

४. आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ४८१ [फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७–अ] प्रमाणे रु.१५,०००/– किंमतीचा वैयक्तीक जात मुचलका सादर करावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

SHAILESH RAJENDRA SATBHAI
Digitally signed by SHAILESH RAJENDRA SATBHAI
Date: 2026.07.18 16:57:28 +0530

दिनांक : १८/०७/२०२६

( एस.आर.सातभाई )
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, सेलू,
जिल्हा–वर्धा.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file is same, word to word as per the original.

(R. M. Khan)
Stenographer (Grade-III)